राज्यात कायदा व सुव्यवस्था हाताबाहेर

विरोधकांचा पत्रकार परिषदेत सरकारवर आरोप; बीड, परभणीतील घटनांचा निषेध; चहापानावर बहिष्कार

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : 'ईव्हीएम'च्या बळावर सत्तेत आलेले राज्यातील सरकार दलित आणि शेतकरीविरोधी आहे. परभणी येथे पोलीस बळाचा वापर करून आंदोलकांवर अत्याचार सुरू आहे. एका आंदोलकाचा पोलीस कोठडीत मृत्यू होतो, तर दुसरीकडे बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांची दिवसाढवळ्या निर्घृण हत्या केली जाते. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था हाताबाहेर गेली असून सरकारचे आरोपींना पाठबळ असल्याचा आरोप करत विरोधकांनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार घातला. विदर्भातील मुख्यमंत्री असतानाही नागपूरमध्ये होणारे हिवाळी अधिवेशन अल्प दिवसाचे असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली.

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रविभवन येथे महाविकास आघाडीच्या संयुक्त बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सरकारवर अनेक आरोप करण्यात आले. यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विधिमंडळ नेते जितेंद्र आव्हाड, आमदार विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रतोद सुनील प्रभू आदींची उपस्थिती होती. परभणी येथे संविधानाची विटंबना झाल्यावर उमटलेल्या पडसादानंतर झालेल्या 'कोंबिग ऑपरेशन' दरम्यान अटक केलेल्या सोमनाथ सोमवंशी या तरुणाचा कारागृहात मृत्यू झाला. अशा सर्व घटना घडत असताना मुख्यमंत्री मात्र मिरवणुकीत गुंतले आहे, असा टोला अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला.

सोयाबीन, कापसाला भाव न देणारे हे सरकार आहे अशी टीकाही दानवे यांनी केली. संख्याबळ कमी असले तरी जनतेचे प्रश्न सभागृहात ताकदीने मांडणार असेही दानवे म्हणाले. यावेळी आमदार महेश सावंत, आमदार ज. मो. अभ्यंकर हे उपस्थित होते.

बीडच्या घटनेची सीबीआय चौकशी करा

शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात संविधानाची विटंबना झाली. बीडमध्ये एका सरपंचाचे अपहरण करून त्याची निर्घृणरित्या हत्या करण्यात आली. बीडमध्ये दोन वर्षांत ३२ हत्या झाल्या आहे. आरोपीला राजकीय वरदहस्त आहे. बीडमध्ये जंगलराज सुरू आहे. त्यामुळे बीडच्या घटनेची सीबीआयमार्फत चौकशी करावी. तसेच उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची चौकशी समिती नेमावी अशी मागणीही विरोधकांनी केली.

मंत्रिमंडळाच्या शपथविधीला निमंत्रण नाही

मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीला विरोधकांनी बहिष्कार टाकला होता. त्यानंतर रविवारी नागपुरात झालेल्या मंत्रिमंडळाच्या शपथविधी सोहळ्याचे विरोधकांना निमंत्रण दिले नाही, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली. सरकारने कुणाला मंत्रिपद द्यावे हा त्यांचा परस्पर निर्णय आहे. काँग्रेसचा गटनेता हा १७ तारखेला ठरेल असेही पटोले म्हणाले. विदर्भाचे मुख्यमंत्री झाल्यावर नागपुरात पहिले अधिवेशन असताना, वैदर्भीय जनतेचा अपेक्षाभंग महायुती सरकारने केला आहे. अधिवेशन कालावधी कमी असल्याची टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

विरोधी पक्षनेते पदासाठी अर्ज करावा लागत नाही

विरोधी पक्षनेते पदासाठी अर्ज करावा लागत नाही. विधानसभा अध्यक्षांनी असे म्हणणे संसदीय परंपरेला धरून नाही. सर्व विरोधी पक्षांना एकत्रित बोलावून या पदासाठी नाव मागितले जाते. हे नाव निश्चित झाल्यावर त्याची सभागृहात घोषणा होते.

अध्यक्षांनी याबाबत अद्याप कुठलीच पावले उचललेली नाही. यावरून सरकार याबाबत सकारात्मक नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड यांनी केली.

विरोधी पक्षनेते पदाबाबत आघाडीत कुठलेही मतभेत नाही, असेही पटोले म्हणाले. या मुद्यावर बोलताना आव्हाड म्हणाले, आतापर्यंत विरोधी पक्षनेते पदासाठी कुठलाही अर्ज आल्याचा नमुना असेल तर तो आम्हाला द्यावा. त्यानुसार आम्ही पुढची कार्यवाही करू.

लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेत देवगिरी महाविद्यालयाची 'फाटा' प्रथम

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : विषयाचे वैविध्य, आशय पोहचविण्यासाठी प्रकाश योजना, संगीत याचा आधार घेत सशक्त अभिनयाने एकांकिका सादर करत छत्रपती संभाजीनगरमध्ये सादर झालेल्या लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेतील सहा एकांकिकांमधून देवगिरी महाविद्यालयाच्या 'फाटा' ने प्रथम क्रमांक पटकावला. नाटकाचे वेड कलाकारांना कसे घडवते, कसे नाचवते, अशी सोपी आणि हास्यप्रधान मांडणी करणारी 'फाटा' मुंबई येथील अंतिम फेरीत धडक मारणार आहेत. भुवन महाविद्यालयाची 'शहाजी' ही एकांकिका द्वितीय ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाची 'विदूर' ही एकांकिका तृतीय ठरली.

विभागीय अंतिम फेरीच्या तयारीसाठी गेल्या काही दिवसांत निवड झालेल्या सहा संघाने सातत्याने सराव केला. शनिवारी दुपारी साडेतीनपासून तापडिया नाट्यमंदिरात नाट्यप्रेमी महाविद्यालय तरुणांची गर्दी व्हायला सुरुवात झाली होती. परीक्षक विजय पटवर्धन आणि धीरेश जोशी यांच्या हस्ते नटराजाचे पूजन झाल्यानंतर एकांकिका सादरीकरणास सुरुवात झाली. प्रकाशझोत, ध्वनीयोजना यावर काम करत सहा संघांनी सादरीकरण केले. संभाजीनगर शहरात जसजशी थंडी वाढत होती तसतसे लोकसत्ता लोकांकिकांच्या मंचावर महाविद्यालयीन तरुणांची ऊर्जा वाढत होती. या स्पर्धेत सरस्वती भुवनच्या 'शहाजी' , डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 'विदूर', देवगिरी महाविद्यालयाची 'फाटा' आणि रंगवास्तू या एकांकिकांना मोठा प्रतिसाद मिळाला. परळी तालुक्यातील शिरसाळा येथील महाविद्यालयातील युवतीच्या संघानेही त्यांची एकांकिका सादर केली. स्पर्धातील विजेत्यांना परीक्षकांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या वेळी लोकसत्ताचे वरिष्ठ वितरण व्यवस्थापक वंदन चंद्रात्रे यांची उपस्थिती होती.

प्रायोजक

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन्स

आपल्या नाटकातील चुका, सादरीकरणातील सफाई येण्यासाठी काय करावे याची चर्चा विद्यार्थ्यांनी परीक्षकांशी केली. पारितोषिक वितरणाच्या वेळी विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्साह होता.

अंतिम फेरीचे मानकरी

- **एकांकिका प्रथम - फाटा ,** देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
- **एकांकिका व्दितीय - शहाजी,** सरस्वती भुवन, छत्रपती संभाजीनगर
- **एकांकिका तृतीय - विदूर,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , छत्रपती संभाजीनगर
- **दिग्ददर्शन** - रामेश्वर झिंझुर्डे, फाटा
- **लेखन** - गोपाळ वाघमारे, विदूर
- **अभिनेता** - स्वनील घोडेराव, एकांकिका विदूर
- **अभिनेत्री** - उपासना पारगावकर - रंगवास्तू
- **नेपथ्यकार** - धनंजय जीवने, एकांकिका, शहाजी
- **संगीत** - मुकेश ढवळे, एकांकिका, फाटा
- **प्रकाशयोजना** - रोशनी वाघमारे, शहाजी

मंत्रीपदासाठी अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला

राष्ट्रवादीच्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : मंत्रिमंडळात विस्तार होत असताना सर्वांची भावना असते की त्यांना संधी मिळावी. सर्व जण ताकदीचे आणि सक्षम नेते आहेत. मात्र जागा मर्यादित असल्याने एकाच वेळी सर्वांना संधी देणे शक्य नाही. त्यामुळे यंदा सर्वांना संधी देण्यासाठी मंत्रिमंडळात अडीच-अडीच वर्षांचा 'फॉर्म्युला' ठरवला असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नागपूरमध्ये आयोजित राष्ट्रवादीच्या मेळाव्यात केली.

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रवादी अजित पवार गटातर्फे रविवारी सिव्हिल लाइन्स येथील वसंतराव देशपांडे सभागृहात पक्षाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या वेळी अजित पवार कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. महामंडळांवर नेमणुका करण्याचा निर्णय तीन महिन्यांत घेऊ, असेही अजित पवार म्हणाले.

काही खर्च टाळता येत नाही

राष्ट्रवादीने महिला व बालविकास विभागाची दिलेली जबाबदारी आदिती तटकरे यांनी नीट प्रकारे सांभाळली आणि लाडकी बहीण योजना यशस्वी केली. लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता मिळणार आहे. काही खर्च हे आपल्याला करावेच लागतात, ते टाळता येणे शक्य नाही, असे मत अजित पवार यांनी व्यक्त केले. या योजनेमुळेच इतक्या मोठ्या संख्येत आमदार निवडून आणता आले, असेही पवार यांनी सांगितले.

'सोयाबीन, कापूस प्रश्नांकडे लक्ष द्यावे लागेल'

विदर्भात सोयाबीन, कापूस हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. भाव मिळत नाही ही शेतकऱ्यांमध्ये भावना आहे, असे मत व्यक्त करत पवार यांनी स्थानिक प्रश्न सोडवण्याकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. विदर्भावर कुठेही अन्याय होऊ नये, याबाबत प्रत्येक निर्णयात काळजी घेऊ. सरकार स्थिर आहे, त्यामुळे चांगले कार्य करणे हीच एकमेव जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

C.U. SHAH COLLEGE OF PHARMACY
SNDT WOMEN'S UNIVERSITY,
Sir Vithaldas Vidyavihar, Juhu Road, Santacruz (W), Mumbai-400049, Mobile No-9869667172
(Approved by AICTE, DTE & PCI)
ADMISSION NOTIFICATION 2024-25
Applications are invited from eligible women candidates for VACANT SEATS of First Year B.Pharm/M.Pharm against CAP, if any. Eligibility criteria and admission procedure: As per MAHACET.ORG Norms of First Year B.Pharm/M.Pharm Brochure 2024 forms are available at Institute. For details online visit: www.mahacet.org, www.sndt.ac.in/ cushahpharmacy/

यात्रासहल
श्रीरामकृष्ण-चारधाम- केदारबद्री-त्रियुगी नारायणसह- ०१.०५.२०२५/ १३.०५.२०२५/ २६.०५.२०२५// आग्रा-मथुरा- कुरुक्षेत्रसह- ०१.०१.२०२५// शास्त्रोक्त- नर्मदा परिक्रमा- १६.०१.२०२५/ ०१.०२.२०२५/ काश्मीर-वैष्णोदेवी- तुलीप गार्डनसह- ०२.०४.२०२५/ १९.०४.२०२५// कर्नाटक दर्शन// कुरवपूर- पिठापूर-पुरी कोणार्कसह- २०.०१.२०२५// मध्य प्रदेश/ सिक्कीम-दार्जिलिंग- लाचुंगसह- १६.०२.२०२५// हंपी-बदामी- विजापूर- ०३.०१.२०२५// नैमिष्यारण्य- त्रिस्थळी यात्रा- अयोध्येसह- १८.१२.२०२४// बापट- ९१३७००१३९५/ ९८२००७१४७१.
0070897793-18

दोस्ती टूर- * सौराष्ट्र-गुजरात * आसाम-अरुणाचल- मेघालय * शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमा * तिरुपती- टेम्पल टूर * अंदमान * नेपाळ-मुक्तीनाथ- जनकपूरसह * त्रिस्थळी- अयोध्या-नैमिष्यआरण्यासह * दुबई 9594880123/ 9702251584.
0070915287-9

मॅरेज ब्युरो
सौ. कुळकर्णी विवाह संस्थेत आजच नाव नोंदवा. उद्योजक, डॉक्टर्स, इंजिनीअर्स, CA, MBA, NRI, बँकर्स सर्व जातींच्या वधू-वरांची हजारो स्थळे. ।। पवित्र विवाह।। 8369692734/ 8450914835/ 9892625606.
0070934850-4

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

महत्त्वपूर्ण निवेदन
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

ADITYA BIRLA CAPITAL — PROTECTING INVESTING FINANCING ADVISING

आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयॉन कंपाऊंड, वेरावल, गुजरात-३६२२६६
कॉर्पोरेट कार्यालय : आर-टेक पार्क, १० वा मजला, निरलॉन कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेसवेलगत, गोरेगाव (पू.), मुंबई-४०००६३.

"परिशिष्ट-IV-ए"
[सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२च्या रुल ९(१) वासह वाचलेल्या रुल ८(६)च्या तरतुदी पाहा]
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८ (६) व रुल ९(१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सह-ऋणको व गहाणकारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा "आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींनी घेतला आहे आणि सदर गहाणवट स्थावर मालमत्तेची विक्री ऋणको / सह-ऋणको / गहाणकार म्हणजेच **सुश्रेया सोनोग्राफी सेंटर, दत्तात्रया श्रीधर उंद्रे व रुपाली दत्तात्रया उंद्रे** यांच्याकडील सुरक्षित धनकोंच्या देय वसुलीच्या तारखेपर्यंत रकमेवरील पुढील व्याज व अन्य खर्च आणि १५.११.२०२३ रोजीप्रमाणे देय व्याज (ही रक्कम टीडीएस गणना व पूर्व-प्रदान आकार, लागू असल्यानुसार आहे) आणि थकीत मुद्दल, थकीत देणीद्वारा (समाविष्ट निघालेले विलंब आकार) **रु. १,२७,५४,६८२.३२/- (रुपये एक कोटी सत्तावीस लाख चोपन्न हजार सहाशे ब्याऐंशी व पैसे बत्तीस फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता २४.०१.२०२५ रोजी "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे.
स्थावर मत्तेच्या राखीव किमतीसह इरठे रक्कम याखाली दिलेली आहे :

स्थावर मत्तेचा तपशील	इसारा रक्कम ठेव रक्कम (रु.'त)	राखीव किंमत (रु.'त)
मालमत्ता १ : रो हाऊस नं. ०३, कार्पेट एरिआ १०५.३५ चौ.मी., बिल्ट-अप एरिआ ११६ चौ.मी. (समाविष्ट बाल्कनीज व बॉक्सेसचा एरिआ), ग्रँड कल्याण, गट नं. ४५/पी व गट नं. ४६/पी यावर बांधकाम केलेले, कांचनवाडी, औरंगाबाद येथे स्थित आणि पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्वेच्या दिशेने** : रो हाऊस नं. २६, **पश्चिमेच्या दिशेने** : इंटरनल रोड, **दक्षिणेच्या दिशेने** : रो हाऊस नं. २, **उत्तरेच्या दिशेने** : रो हाऊस नं. ४.	८,२०,७००/-	८२,०७,०००/-
मालमत्ता २ : फ्लॅट नं. २४, मोजमापाचा ७९१ चौ.फू. बिल्ट-अप एरिआ, गट नं. ९२, "साई लाभ एन्क्लेव्ह", इतखेडा, पैठण रोड, औरंगाबाद येथे स्थित आणि पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्वेच्या दिशेने** : स्टेअरकेस व फ्लॅट नं. २१, **पश्चिमेच्या दिशेने** : अपार्टमेंट साइड मार्जिन, **दक्षिणेच्या दिशेने** : फ्लॅट नं. २३, **उत्तरेच्या दिशेने** : अपार्टमेंट साइड मार्जिन.	४,३४,८००/-	४३,४८,०००/-
एकूण	१२,५५,५००/-	१,२५,५५,०००/-

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर म्हणजेच https://mortgagefinance.adityabirlacapital.com/Pages/Individual/Properties-for-Auction-under-SARFAESI-Act.aspx किंवा https://sarfaesi.auctiontiger.net यावर तरतूद केलेली लिंक पाहावी.
स्थळ : औरंगाबाद, **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : १६.१२.२०२४ **(आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड)**

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए - स्थावर मालमत्तेची ई-लिलाव - जाहीर विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदीसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना
नोंदणीकृत कार्यालय : १७वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तूरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१. फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय : २०१/२०२, दुसरा मजला, मेट्रो ९९ कमर्शियल कॉम्प्लेक्स, कॉलेज रोड, नाशिक-४२२ ००५, महाराष्ट्र.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. 'डी'मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विद्यावत/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. 'सी'मध्ये वर्णिलेल्यानुसार) मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशिलानुसार **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.
ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविल्यानुसार जसे असेल त्यानुसार संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाणवट मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोलीवृद्धी दर (एच)	पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरणे, जर असल्यास (के)
एचओवू/एनएसके/०७१९/७१८२१८ मकरंद जगन्नाथ मुरकुटे / हिराबाई जगन्नाथ मुरकुटे शा.का. : नाशिक	रु. १२४१८७९१.१८/- २६.०६.२०२१ रोजीप्रमाणे	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट नं. १०५, दुसरा मजला, प्लॉट नं. ३४०, सर्व्हे नं. ६२/१+६२/ २+६३+६४, सर्वोदय अपार्टमेन्ट, आराध्या गार्डन अपार्टमेन्टच्या मागे, ईबेझर स्कूलसमोर, अशोका युनिव्हर्सल स्कूलजवळ, गंगापूर रोड, चांदशी शिवार, नाशिक-४२२ ००५, महाराष्ट्र. (६१८ कार्पेट एरिया)	रु. १८०२०००/-	रु. १८०२०००/-	३०.१२.२०२४	रु. १०,०००/-	२४.१२.२०२४ रोजी दु. १२.३० व दु. ०४.०० दरम्यान	३१.१२.२०२४ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान	ज्ञात नाहीत

*त्यावरील वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील ब्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह एकत्रित. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीनुसार रकाना क्र. 'के'मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेही कोणताही भार नाही. याअधिक, सदर भार यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या/ तिच्यावाकडील, सोसावयाचे आहेत/ प्रदान करावयाचे आहेत. भावी खरेदीदार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्रपीत्या पडताळणी करून निश्चित करावेत.
(१) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, हस्तांतरण करणे आणि/ किंवा वासलात लावणे यापासून 'पीएनबीएचएफएल'/ 'पीएनबीएचएफएल'च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास न्यायालयाकडून कोणताही आदेश आणि/ किंवा निषेधाज्ञा आलेली नाही.
(२) भावी खरेदीदार/ बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. 'के'मध्ये नमूद केलेल्या व मंजूर केलेल्या प्रक्रिया/ आदेश इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट; परंतु त्याकरिता 'पीएनबीएचएफएल'कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकारांच्या कागदपत्रांच्या नामाधिकार मर्यादित नाहीत आणि विविध/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रदान सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत.
(३) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)नुसार, बोलीदार/ खरेदीदाराने स्थान दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट) २५% ठेव, कावदेशीरीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(२)नुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन रकमेच्या उर्वरित ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरेदीदाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रामध्ये नमूद केलेल्या १५ दिवसांच्या अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री विचाराधीन रकमेची भागशः रक्कम जप्त करतील आणि सरफेसी ॲक्टच्या तरतुदींनुसार मालमत्ता/ सुरक्षित मत्ता पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल.
(४) सीए इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले- प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२ ००३ वेबसाइट- www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करण किंवा मालमत्तेच्या पाहणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास श्री. पंकज तिवारी/ अमोल माने, टोल फ्री नं.: १८०० १२० ८८००, ई-मेल: auction@pnbhousing.com, जी 'पीएनबीएचएफएल'ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.
स्थळ : नाशिक दिनांक : १६.१२.२०२४ स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

homefirst — We'll take you home
Home First Finance Company India Limited
CIN: L65990MH2010PLC240703
Website: homefirstindia.com
Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

ताबा सूचना
संदर्भ: सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ च्या उप-नियम (१) अंतर्गत ताबा सूचना
ज्याअर्थी होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकार यांनी, सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँण्ड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा कायदा क्र. ५४) अंतर्गत खाली दिल्याप्रमाणे संबंधित तारखांना जारी केलेल्या मागणी नोटिसच्या अनुषंगाने आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, संबंधित नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत थकबाकी भरण्यासाठी खाली नावे असलेले तुम्हाला/ कर्जदारांना आवाहन केले. तथापि, तुम्ही/ कर्जदार सर्व, निर्धारित वेळेत सांगितलेली थकबाकी भरण्यात अयशस्वी झाला आहात, म्हणून **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड** हे त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा उपयोग करत आहे आणि सरफेसी कायदा, २००२च्या कलम १३च्या उप कलम (४) च्या तरतुदीनुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे सुरक्षित मालमत्तेचा **ताबा** घेतला आहे.

अ. क्र.	कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदारांचे नाव	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन	डिमांड नोटिसची तारीख	डिमांड नोटिसच्या तारखेनुसार एकूण थकबाकी (रुपयात)	ताब्यात घेण्याची तारीख
1.	राजू गायकवाड, शोभा राजू गायकवाड	रो हाउस - ब्लॉक नं. ४, प्लॉट नं.६०, गट नं. २१८, ब्लॉक क्र. ४ (पूर्व बाजूचा भाग), प्लॉट नं. ६०, गट क्र.२१८, ग्रा.पं. शिरसोली, जळगाव, महाराष्ट्र, ४२५००२. द्वारे सीमाबद्ध - पूर्व : प्लॉट क्र. ६१, पश्चिम : ब्लॉक क्र. ०३ लगत, उत्तर: रस्ता, दक्षिण : प्लॉट क्र. ५८ व ५९ लगत.	03-10-2024	771,914	10-12-2024
2.	गौरव पुनम मराठे-, कोमल गौरव मराठे	रो हाउस-प्लॉट ०९ दक्षिण पी, प्लॉट क्र ९ गट क्र १५५/२, मौजे मोराणे, प्लॉट ०९ दक्षिण बाजू, प्लॉट क्र. ९-दक्षिण भाग, गट क्र. १५५/१, मौजे मोराणे, धुळे, महाराष्ट्र, ४२४००१. द्वारे सीमाबद्ध - पूर्व: ९.० मी रुंद रस्ता, पश्चिम: जी. क्र. १५१/१, उत्तर: त्याच प्लॉट क्र. ०९ चा उर्वरित भाग, दक्षिण: प्लॉट क्र. १०.	03-10-2024